स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६—२७/५० दि. २३/०५/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्याकरिता आयोजित बैठकीस उपस्थित राहण्याबाबत...

संदर्भ : १.मा. उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (निवडणूक शाखा) यांचे क्र.पीईई३/कावि/४९८/२०२६,दि. २१/०५/२०२६ रोजीचे पत्र
२.मा. उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (निवडणूक शाखा) यांचे क्र.पीईई३/कावि/४९७/२०२६,दि. २१/०५/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून महाराष्ट्रासह एकूण १९ राज्य आणि ०३ केंद्रशासित प्रदेशामध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण(SIR) कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(BLO) यांना सहाय्य करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने जिल्हयामधील सर्व मतदार संघामध्ये करावयाच्या तयारीबाबत, विशेष सखोल पुनरिक्षण(SIR) कार्यक्रमाच्या माहितीबाबत तसेच मतदारांमध्ये करावयाच्या जनजागृती व व्यापक प्रसिध्दीबाबत माहिती देण्याकरिता व कार्यक्रम यशस्विरित्या राबविण्याकरिता नियोजन बैठकीचे आयोजन दि. ०१ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे.

सदर बैठकीस आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी, विभाग समन्वयक, जिल्हा समन्वयक यांना दि. ०१ जून २०२६ रोजी, सायं. ०४.०० वाजता, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे याठिकाणी उपस्थित राहण्याविषयी कळवावे व सदर कालावधीत त्यांची कर्तव्य रजा मंजूर करावी. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (निवडणूक शाखा)

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे बी विंग 4 था मजला पुणे 411001

फोन नं. 020-26134478 Email – dydeopune१@gmail.com


**निवडणूक: अतिमहत्वाचे**

क्र.पीईई३ /कावि/ ४९८/२०२६ दिनांक :२१/०५/२०२६

प्रति,

1) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.
2) कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
3) श्री.अजय शिंदे,प्रादेशिक संचालक, प्रादेशिक संचालनालय, NSS 'A' वसतिगृह विभाग, कृषी महाविद्यालय परिसर, शिवाजीनगर, पुणे- 411 005.
4) श्री. डॉ. मिलिंद काळे,राज्य एनएसएस अधिकारी, (अतिरिक्त प्रभार) राज्य एनएसएस सेल,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, 3, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१.
5) श्री. डॉ.गणेश भामे,NSS कार्यक्रम समन्वयक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,गणेशखिंड,पुणे -०७.
6) डॉ सुनील भांगे.NSS कार्यक्रम समन्वयक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी – 413 722 जि- अहमदनगर
7) डॉ. दीपक माळी, सहाय्यक संचालक व रा.से.यो. कार्यक्रम समन्वयक, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डिंग, पुणे – 411001
8) श्रीकांत मडावी, एनएसएस कार्यक्रम समन्वयक, पॉलिटेक्निक महाराष्ट्र तंत्र संचालनालय. शिक्षण, ३ महापालिका मार्ग, P. B. क्र. १९६७, मुंबई -४०००0१.
9) श्री. पी. डी. डोंगरे, NSS कार्यक्रम समन्वयक (ITI - महाराष्ट्र राज्य), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, 3 महापालिका मार्ग, पोस्ट बॉक्स क्र. 10036, मुंबई - 400 001.

विषय :- **मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR)-2026.**
विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्याकरिता आयोजित बैठकीस उपस्थित राहण्याकरिता आपल्या स्तरावरून निर्देश देणेबाबत.

संदर्भ : 1) मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांची प्रेस नोट No.ECI / PN / ०८६ / २०२६, दि.14/05/2026.
2) या कार्यालयाचे पत्र. क्र.पीईई३ /कावि/ ४९७/२०२६ ,दिनांक :२०/०५/२०२६

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, मा.भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून उपरोक्त संदर्भीय प्रसिद्धी पत्रकाद्वारे महाराष्ट्रासह एकूण १९ राज्य आणि ०३ केंद्रशासित प्रदेशामध्ये मध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रम हा महारष्ट्रामध्ये दि.20/06/2026 पासून सुरु होणार असून त्याचे संपूर्ण वेळापत्रक हे मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी प्रसिद्ध केलेल्या वरील संदर्भीय प्रेस नोट मध्ये देण्यात आलेले आहे.

त्यानुसार सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना सहाय्य करण्याकरिता NSS चे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने त्यानुषंगाने जिल्हातील सर्व मतदारसंघामध्ये करावयाच्या तयारीबाबत, विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमाच्या माहितीबाबत तसेच मतदारांमध्ये करावयाच्या जनजागृती व व्यापक प्रसिद्धीबाबत माहिती देणेकरीता व कार्यक्रम यशस्विरित्या राबविणे कामी NSS च्या महाविद्यालय समन्वयक, एरिया समन्वयक, जिल्हा समन्वयक व विद्यापीठ समन्वयक यांची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

**बैठकीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

1) दिनांक: 01/06/2026.
2) वेळ: दुपारी 04 वाजता.
3) स्थळ: जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे.

**बैठकीमध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे :-**

- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) बाबत माहिती.
- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वयंसेवकांचा कृती आराखडा.
- मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना NSS स्वयंसेवकांकडून सहाय्य उपलब्ध करून देण्याची कार्यपद्धती.
- घरभेटी, मतदार पडताळणी व माहिती संकलन प्रक्रियेत स्वयंसेवकांचा सहभाग.
- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) कार्यक्रमामध्ये / मतदार नोंदणी प्रक्रियेमध्ये निवडणूक आयोगाच्या नियमांचे पालन.
- युवकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती व लोकशाही प्रक्रिया व राष्ट्रीय कर्तव्य पार पडण्यासाठी युवकांचा सहभाग वाढविणे.
- स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, जबाबदाऱ्या व कार्यपद्धती निश्चित करणे.
- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) ची व्यापक जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविणे.

लोकशाही प्रक्रियेमध्ये व राष्ट्रीय कर्तव्य पार पडण्यासाठी अधिकाधिक युवकांचा सहभाग झाल्यास विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) ची प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने राबविता येणे शक्य आहे. तरी संबंधित समन्वयकांनी सदर बैठकीस वेळेत उपस्थित रहावे याकरिता वरील संदर्भ क्र.02 मधील पत्रानुसार पुणे जिल्ह्यातील सर्व NSS संबंधित उपस्थित राहण्याबाबत या कार्यालयाकडून कळविले आहे. सदर पत्र सोबत जोडले आहे.

तरी आपण आपल्या आधिपत्याखालील NSS विद्यापीठ समन्वयक, NSS जिल्हा समन्वयक, NSS एरिया समन्वयक, NSS महाविद्यालय समन्वयक, Self-Financing असलेल्या विद्यापीठा /संस्था-NSS समन्वयक यांना सदर बैठकीस उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरून निर्देश द्यावेत.

( मिनल कळसकर )
उपजिल्हाधिकारी तथा
उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे

प्रत: १) मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई 400 032 यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे (सामान्य प्रशासन शाखा) यांना माहितीस्तव सविनय सादर.

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (निवडणूक शाखा)

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे बी विंग 4 था मजला पुणे 411001

फोन नं. 020-26134478 Email – dydeopune१@gmail.com


**निवडणूक: अतिमहत्वाचे**

क्र.पीईई३ /कावि/ ४९७/२०२६ दिनांक :२१/०५/२०२६

प्रति,

प्रति,

पुणे जिल्ह्यातील सर्व,

NSS विद्यापीठ समन्वयक,

NSS जिल्हा समन्वयक,

NSS एरिया समन्वयक,

NSS महाविद्यालय समन्वयक,

Self-Financing असलेल्या विद्यापीठा/संस्था, NSS समन्वयक.

विषय :- **मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम** (SIR)-2026.
विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्याकरिता आयोजित बैठकीस उपस्थित राहण्याबाबत.

संदर्भ : 1) मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांची प्रेस नोट No.ECI / PN / ०८६ / २०२६, दि.14/05/2026.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, मा.भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून उपरोक्त संदर्भीय प्रसिद्धी पत्रकाद्वारे महाराष्ट्रासह एकूण १९ राज्य आणि ०३ केंद्रशासित प्रदेशामध्ये मध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रम हा महारष्ट्रामध्ये दि.20/06/2026 पासून सुरु होणार असून त्याचे संपूर्ण वेळापत्रक हे मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी प्रसिद्ध केलेल्या वरील संदर्भीय प्रेस नोट मध्ये देण्यात आलेले आहे.

सध्यस्थितीत राज्यामध्ये विधानसभा मतदार संघाच्या मतदार याद्यांच्या भागाची विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूर्वतयारी करण्यात येत आहे. त्यामध्ये सध्याच्या यादीतील मतदारांच्या नोंदणीची सन 2002 मध्ये झालेल्या विशेष सखोल पुनरीक्षनांतर्गत तयार करण्यात आलेल्या मतदार यादीतील नोंदीशी जुळवणी करण्यात येत आहे. सदरचे मॅपिंग हे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांचेमार्फत, मतदारांच्या घरी जाऊन त्यांना प्रत्यक्ष भेटून, त्यांचे सन 2002 रोजीचे तपशील घेऊन मॅपिंग करण्याचे काम चालू आहे.

त्यानुसार सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना सहाय्य करण्याकरिता NSS चे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने त्यानुषंगाने जिल्हातील सर्व मतदारसंघामध्ये करावयाच्या तयारीबाबत, विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमाच्या माहितीबाबत तसेच मतदारांमध्ये करावयाच्या जनजागृती व व्यापक प्रसिद्धीबाबत माहिती देणेकरीता व

कार्यक्रम यशस्विरित्या राबविणे कामी NSS च्या महाविद्यालय समन्वयक, एरिया समन्वयक, जिल्हा समन्वयक व विद्यापीठ समन्वयक यांची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

**बैठकीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

1) दिनांक: 01/06/2026.
2) वेळ: दुपारी 04 वाजता.
3) स्थळ: जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे.

**बैठकीमध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे :-**

- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) बाबत माहिती.
- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वयंसेवकांचा कृती आराखडा.
- मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना NSS स्वयंसेवकांकडून सहाय्य उपलब्ध करून देण्याची कार्यपद्धती.
- घरभेटी, मतदार पडताळणी व माहिती संकलन प्रक्रियेत स्वयंसेवकांचा सहभाग.
- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) कार्यक्रमामध्ये / मतदार नोंदणी प्रक्रियेमध्ये निवडणूक आयोगाच्या नियमांचे पालन.
- युवकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती व लोकशाही प्रक्रिया व राष्ट्रीय कर्तव्य पार पडण्यासाठी युवकांचा सहभाग वाढविणे.
- स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, जबाबदाऱ्या व कार्यपद्धती निश्चित करणे.
- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) ची व्यापक जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविणे.

लोकशाही प्रक्रियेमध्ये व राष्ट्रीय कर्तव्य पार पडण्यासाठी अधिकाधिक युवकांचा सहभाग झाल्यास विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) ची प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने राबविता येणे शक्य आहे. तरी आपण संबंधित समन्वयकांनी सदर बैठकीस वेळेत उपस्थित रहावे.

( मिनल कळसकर )
उपजिल्हाधिकारी तथा
उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे

प्रत: १) मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई 400 032 यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे (सामान्य प्रशासन शाखा) यांना माहितीस्तव सविनय सादर.